प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १० जून २०२२**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ क्षेत्र विकास कामांकरिता सज्ज**
**सिडकोने गाठला नवी मुंबई विमानतळ प्रकल्पातील महत्त्वाचा टप्पा**

सिडको महामंडळातर्फे साकारण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प क्षेत्रातील गावांमधील एकूण ३०७० बांधकामे निष्कासित करण्यात आली असून ११६० हे. क्षेत्रफळ विमानतळ सवलतदार यांना हस्तांतरीत करण्यात आले आहे. तसेच या गावांतील सुमारे ५,००० हून अधिक कुटुंबांचे पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्रातील पुनर्वसन प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. यामुळे सिडकोतर्फे नवी मुंबई विमानतळ प्रकल्पातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे.

**“प्रकल्पबाधितांच्या सहकार्यामुळेच विमानतळ प्रकल्पातील आजवरचे महत्त्वाचे टप्पे सिडकोने यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे पूर्ण क्षेत्र विकासासाठी उपलब्ध करून देण्याचे आव्हानात्मक काम देखील यास अपवाद नव्हते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प नियोजित वेळेनुसार पार पडत असून हा प्रकल्प मार्गी लागला आहे."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडकोतर्फे रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यामध्ये १० गावे संपादित करून ११६० हेक्टर क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. एका राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या प्रकल्पासाठी या गावांतील ग्रामस्थ देत असलेले योगदान लक्षात घेऊन सिडकोतर्फे या प्रकल्पबाधितांना महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेले, देशातील सर्वोत्तम पुनर्वसन पॅकेज देण्यात आले आहे. तसेच विमानतळ प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाकरिता सिडकोतर्फे विमानतळ क्षेत्रालगत पुष्पक नगर हे सर्व भौतिक, सामाजिक व सांस्कृतिक पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्र विकसित करण्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता सिडकोला प्रत्येक टप्प्यावर प्रकल्पबाधितांचे उत्तम सहकार्य लाभले. आतापर्यंत विमानतळ गाभा क्षेत्रातील ३,०७० इमारती सिडकोकडून निष्कासित करण्यात आल्या आहेत. निष्कासित

करण्यात आलेल्या इमारतींमधील ५,००० हून अधिक कुटुंबांचे पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्रात स्थलांतर करण्याचे प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

सार्वजनिक वापरातील इमारती, चर्च तसेच सार्वजनिक व खासगी मालकीची मंदिरे मिळून एकूण ५६ मंदिरांचे पुनर्वसन क्षेत्रात स्थलांतर करण्यात आले असून ग्रामस्थांच्या सहकार्याने मूर्तींची सन्मानपूर्वक प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. समाज मंदिर, शाळा आणि स्मशानभूमी मिळून एकूण २७ बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

विमानतळ क्षेत्रातील महत्त्वाची विकासपूर्व कामे यापूर्वीच पूर्ण झाली आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी प्रकल्पबाधित व ग्रामस्थांचे नेहमीच महत्त्वपूर्ण योगदान लाभले असून नवी मुंबई शहराला जगाच्या नकाशावर महत्त्वाचे स्थान प्राप्त होईल यात शंका नाही.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**